तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/माध्य-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- 16 AUG 2017 ५६५८/५६६९

प्रति

अध्यक्ष/सचिव,

नवग्रह शिक्षण प्रसारक मंडळ, मु.पो. किवळे, ता. हवेली, जि. पुणे

**विषय -** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय एसएफएस-२०१७/प्र.क्र.१४४/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि २९.०५.२०१७

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | नवग्रह शिक्षण प्रसारक मंडळ, मु.पो. किवळे, ता. हवेली, जि. पुणे | एंजल्स पब्लिक स्कुल मु.पो किवळे, ता. हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्य मंडळ) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक(इ. १ ली ते १२ वी) | २०१६-१७ |

**अटी व शर्ती :-**

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाचीं छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा प्रवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. रा ग गुंजाळ, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Scanned with OKEN Scanner

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग, पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
वेब साईट- WWW.dydepune.com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/२०२०-२०२१/ 4054

दिनांक : 24 SEP 2020

प्रति,
अध्यक्ष/ सचिव, नवग्रह शिक्षण प्रसारक मंडळ, मु.पो.किवळे ता.हवेली जि.पुणे

**विषय :** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगी बाबत.
नवग्रह शिक्षण प्रसारक मंडळ, मु.पो.किवळे ता.हवेली जि.पुणे संचलित एंजल पब्लिक स्कूल,मु.पो.किवळे ता.हवेली जि. पुणे या शाळेच्या संलग्नतेमध्ये राज्यमंडळ ऐवजी सी.बी.एस.ई.व प्रकरण क्रमांकामध्ये एसएफएस-१०१७/प्र.क्र. १४४/एसएम-२ ऐवजी एसएफएस-१०१७/प्र.क्र. ११७/एस-एम-२ अशी दुरुस्ती करणेबाबत.

**संदर्भ :**
१. शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र. १४४/एसएम-२, दिनांक २६.५ २०१७
२. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/माध्य-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१३/५६६१, दिनांक १६.८.२०१७
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई कडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक एसएफएस-१०१७/प्र.क्र.११७/एसएम-२, दिनांक १८.२.२०२०

**शुध्दीपत्र :**

या कार्यालयाचे संदर्भीय क्रमांक २ पहावे त्यामधील रकाना क्रमांक ६ मध्ये शाळेच्या मंडळ संलग्नतेमध्ये **राज्य मंडळ ऐवजी सी.बी.एस.ई.** व प्रकरण क्रमांकामध्ये **एसएफएस-१०१७/प्र.क्र. १४४/एसएम-२ ऐवजी एसएफएस-१०१७/प्र.क्र. ११७/एस-एम-२ अशी दुरुस्ती संदर्भीय क्र. ३ च्या शासन शुध्दीपत्रकानुसार केलेली आहे. त्यामुळे या दुरुस्तीनुसार वाचावे.**

२. सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा/दर्जावाढ करण्यास परवानगी देण्यावाबतच्या संदर्भाधीन क्र. २ च्या या कार्यालयाचे दिनांक १६.८.२०१७ च्या पत्रातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

(व्ही.के.खांडके)
**प्र.शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे ०१**

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा.कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मादाम कामा मार्ग,मुंबई-४०००३२.
२. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रत : माहितीस्तव रवाना
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे



Scanned with OKEN Scanner